- प्रकरण २ -

## रामचंद्रपन्ताचे छ. शिवाजी आणि संभाजी यांच्या कालातील कार्य

रामचंद्र पंताचे छ. शिवाजीच्या कालातील कार्य :-

छत्रपती शिवाजी महाराज यांनी सामान्य मराठी माणसात स्वातंत्र्य विषयक प्रेम निर्माण करुन मराठी राज्य निर्माण केले. शिवाजी राजांना माणसांची चांगली पारख होती. रामचंद्रपंताच्या घराण्यातील माणसांचे कर्तृत्व पाहूनच तथा कर्तृत्व निर्माण करण्याची त्या माणसांची कुवत लक्षात घेऊन शिवाजी राजांनी त्यांना जबाबदारीच्या व मानसन्मानाच्या जागा दिलेल्या होत्या. रामचंद्रपंताचे वडील निळोपंत यांनी शिवाजी महाराजांच्या आदेशाचे पालन करुन आपल्या स्वत:च्या पराक्रमावर व कर्तृत्ववावर शिवाजी महाराजांच्या कर्तृत्ववान अधिका-यांच्यामध्ये मानाचे स्थान प्राप्त केले होते. त्यांचे ते स्थान त्यांचे वडील सोनोपंत यांच्यामुळे प्राप्त झाले होते, असे म्हणता येणार नाही. हे खरे आहे की बापाच्यामुळे म्हणजे सोनोपंतामुळे निळोपंताला, शिवाजी महाराजांच्या विश्वासू लोकांच्यामध्ये शिरकाव करुन घेण्यास संधी मिळाली होती. पण केवळ तेवढयावर निळोपंत शिवाजी महाराजांच्या जवळचे स्थान टिकविण्यास समर्थ होऊ शकत नव्हते. त्यांना स्वत:ला काहीच कर्तृत्व गाजविता आले नसते. तसेच शिवाजी महाराजांच्या विश्वासू अधिका-यांच्या-मध्ये किंवा नोकर वर्गामध्ये सुध्दा राहाता आले नसते.

अशा या निळोपंताचे चिरंजीव म्हणून रामचंद्रपंतास शिवाजी महाराजांच्या विश्वासनीय लोकांमध्ये शिरकाव करुन घेता येण्यासारखे होते. पण शिवाजी महाराजांच्या पुढील त्या कालातील आव्हाने लक्षात घेता, केवळ तेवढी बाब

---

१. गोरे,रा.म., उपरोक्त., पृ. २२-२३.

पुरेशी नव्हती. ब्राम्हण असो, की अब्राम्हण असो; शिवाजी महाराजांना कर्तृत्ववान माणसांची गरज होती. लहानपणापासूनच अशी माणसे शोधण्यामध्ये शिवाजी महाराजांनी खास लक्ष पुरविले होते. म्हणूनच आपल्या अंत्य समयी शिवाजी महाराजांनी आपल्या विश्वासातील ज्या काही तरुण अधिकाऱ्यांच्या विषयी चांगला आशावाद व्यक्त केला होता, त्यामध्ये रामचंद्रपंताचा खास उल्लेख केलेला आहे. कृष्णाजी अनंत सभासद लिखित "श्री शिवप्रभूचें चरित्र" या शिवाजी महाराजांच्या चरित्रकथा बखरीमध्ये शिवाजी महाराज रामचंद्रपंताविषयी म्हणतात-- "आता कारकुनांमध्यें माझे वेळेचे थोरले कारकुन यासं तो संभाजी वाचूं देणार नाहीं, त्यांपैकी एक प्रल्हादपंत निराजीपंताचे पुत्र व रामचंद्रपंत निळोपंताचे पुत्र हे दोघे ब्राम्हण पराक्रमी होतील. निळोपंत प्रधानाचा पुत्र काही नांव धरील".[2] याचांच अर्थ असा की रामचंद्रपंतांच्या कर्तृत्वावर शिवाजी महाराजांचा विश्वास होता. आणि हेच रामचंद्रपंत पुढे शिवाजी महाराजांच्यानंतर मराठा राज्याचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ झालेले आहेत.

रामचंद्रपंतांची कारकीर्द, त्यांचे वडील निळोपंत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवाजी महाराजांच्या आशीर्वादाने सुरु झालेली होती. रामचंद्रपंताच्या विषयी शिवाजीने लहानपणीच आशावाद व्यक्त केल्याचे गोरे यांनीही सांगितले आहे. ते त्यासंबंधी लिहितात-- "शिवाजीनें याचा स्वभाव, तेजस्वीपणा, हुषारी आणि चातुर्ययुक्त खेळ हीं पाहून भविष्य केले कीं, पुढें हा मुलगा बुध्दिमान व पराक्रमी होईल. तो निळोपंतांस म्हणे कीं, या मुलानें तुम्हांसं खरें पुत्रवान् केलें आहे. हें भविष्य शेवटीं खरे झालें."[3] शिवाजी महाराजांचे रामचंद्राकडे

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

२. वाकसकर, वि.स., संपा. कृष्णाजी अनंत सभासदाची बखर. छत्रपती श्रीशिवप्रभूचें चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ति, १९७३, पृ. १११-११२.

३. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ. २६

तो लहान असे . पासूनच लक्ष होते. त्याला त्याच्या वडीलांनी तत्कालीन रिवाजाप्रमाणे शिक्षण दिलेले दिसते. कारण अगदी लहान वयात म्हणजे वयाच्या १८व्या वर्षीच शिवाजी राजानी त्याच्याकडे सिंधुदुर्ग किल्ल्याची सबनिशी दिली होती. या संदर्भातील रामचंद्रपंताला जो हुकूमनामा दिला होता तो पुढीलप्रमाणे आहे:

"मसुरूल अनाम राजेश्री रायाजि भोसले हवालदार जंजिर सिधुदुर्ग प्रति राजश्री सिवाजीराजे सुा समान सीतैन अलफ, सोरा राजचंद्र निलकंठ यास जंजिरे मजकुरीची सबनीसी साहेब मेहरबान होऊन वतन दिल्ही आहे यास ई।। पै।। पासून सालिन्या तैनाती होनु १०० शेभरी पातशाही केले आहे ती सालमजकुरी सिरस्ता केला आहे तेणेप्रमाणे आदा करणे व यारेदी व कागदबाब बारनिस हाती माजी प्रमाणे लिहिणीयास देत जाणे माईले आपला मुतालीक जंजिरे मजकुरास पाठवितील त्याचे हाती सबनीसाचा कारभार घेत जाणे व ११ माहे जिल्काद मोर्तबसूद:"४

अर्थात रामचंद्रपंताची प्रत्यक्ष कारकीर्द किंवा कार्य वरील हुकूमनाम्याच्या आधारे तारीख१३ एप्रिल १६६८ पासून सुरु झाले असले तरी त्यापूर्वीच तो प्रत्यक्ष राबित्यामध्ये लागला असावा. एरवी एकाएकी सबनिशी दिली असेल असे वाटत नाही. परंतु रामचंद्रपंताविषयी अजूनही फारशी माहिती उपलब्ध झालेली नाही आणि जी माहिती उपलब्ध आहे. ती प्रामुख्याने शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्या कारकीर्दीनंतरची आहे. तथापी ज्या अर्थी शिवाजी महाराजांनी रामचंद्रपंताला आपल्या राज्याभिषेकाच्या वेळी अष्टप्रधानमंडलामध्ये स्थान देऊन मुजुमदार म्हणून नेमले होते, त्याअर्थी रामचंद्रपंत निश्चितच मोठा

---

४. सबनीस, के.गो., उपरोक्त., पृ.९.

कर्तबगार अधिकारी असला पाहिजे; हे निर्विवाद आहे. या अष्टप्रधानमंडळामध्ये रामचंद्रपंताचे स्थान अमात्य म्हणजे मुजुमदार, म्हणजेच महसूल मंत्री, हे दुसऱ्या[5] नंबरचे आहे. १६७४ पूर्वी म्हणजे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापूर्वी रामचंद्रपंताला मुजुमदारी मिळाली असल्याचा उल्लेख आहे. तो संदर्भ असा-- रामचंद्रपंताचे वडील निळोपंत हे ग.ह. खरे यांच्या मतानुसार इ.स. १६७२ मध्ये मरण पावले. "तेव्हा यांचे मजमूचें काम प्रथम त्यांच्या नारायण व रामचंद्र या दोन मुलांकडे व नंतर एकट्या रामचंद्रपंतांकडे देण्यात आले"[6] सप्तप्रकरणात्मक बखरीमध्येही असाच उल्लेख आहे. बखरकार चिटणीस या बाबतीत लिहितात-- "तसेच निळो सोनदेव मजुमदार वारले. त्यांचे पुत्र दोघे. वडील नारोपंत, धाकटे रामचंद्रपंत. परंतु नारोपंत नाकाबिल, आर्ष होते. म्हणून रामचंद्रपंत यांसच पद देऊन मजमूचें काम त्यांजपासून घेऊन चालविलें."[7] अर्थात रा.म. गोरे यांनी मात्र रामचंद्रपंताला इ.स. १६७२ मध्ये मुजुमदारी मिळाली होती असे म्हटले नाही. त्यांच्या मतानुसार निळोपंताच्या मृत्यूनंतर त्यांचे जेष्ठ चिरंजीव नारोपंत यानाच शिवाजी महाराजांनी मुजुमदारी दिलेली होती, परंतु त्या मुजुमदारीचे प्रत्यक्ष काम मात्र रामचंद्रपंतच करीत होते.[8] तेव्हा गोरे यांचे हे मत किंवा ग.ह. खरे यांचे मत आणि बखरकार चिटणीस यांचे मत विचारात घेता हे स्पष्ट होते की रामचंद्रपंताने प्रत्यक्षामध्ये मुजुमदार म्हणूनच काम केलेले होते. शिवाय कृष्णाजी अनंत सभासद यांचे मत लक्षात घेता हे ही मत स्पष्ट होते की नारोचंद्रपंताबरोबरच रामचंद्रपंतास मुजुमदारी मिळालेली होती.[9] स्वाभाविकच रामचंद्रपंतानी त्या पदावर चांगले काम केल्याचा परिणाम म्हणून शिवाजी महाराजांनी त्यालाच आपल्या अष्टप्रधान-- मंडळात समाविष्ट करून घेतले होते. रामचंद्रपंताचा हा एक प्रकारे अगदी लहान

---

5. SGSNHM., p. 223.
६. खरे-भिडेआ., पृ. १४.
७. कुलकर्णी, भीमराव., उपरोक्त., पृ. १३३-३८.
८. गोरे,रा.म., उपरोक्त., पृ. २७.
९. नाकस्कर, वि.स., उपरोक्त., पृ. ८१.

वयांमध्ये मोठा गौरव होता. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानमंडळातील इतर मातबर मंत्र्यांच्या नावांचा उल्लेख करताना हे स्पष्टपणे कळून येते की त्या सर्व मंत्र्यांपेक्षा रामचंद्रपंत वयाने लहान असला तरी त्याचे कार्य शिवाजी महाराजांना पसंत पडलेले होते. किंबहुना तो आपल्या अष्टप्रधानमंडळात आवश्यक असल्यानेच शिवाजी महाराजांनी त्याची पदोन्नती केलेली होती. "मुजुमदार" या त्याच्या हुद्दा ऐवजी त्याला"अमात्य" हा नवा हुद्दा दिलेला होता. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर महाराजांनी त्याला अमात्य-पदाचा अधिकार आणि वस्त्रे दिली. महाराजांनी जी वस्त्र व जे दागिने आणि इतर वस्तू अमात्य म्हणून दिल्या त्यांचा तपशील पुढील प्रमाणे आहे--

| | |
|---|---|
| "१. प्रथम भेटीचे वेळी | - चादर (हडीदार). |
| २. पदाची वस्त्रे | - मंदील, चादर (हडीदार) जामेवार, किनरवाप, पटका. |
| ३. शस्त्रे | - ढाल, तलवार. |
| ४. जवाहिरांचे दागिने | - शिरपेंच, मोत्यांची कंठी, चौकडा, तुरा. |
| ५. वाहने | - हात्ती व घोडा. |
| ६. इतर जिन्नस | - शिक्के, कटार (कटारीदार व शिक्का) रुप्याचे दांडीची चवरी, आणि कलमदान."[१०] |

शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानमंडळातील अमात्य म्हणजे महसूलमंत्री या नात्याने रामचंद्रपंताकडे अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपविली होती. त्याचे वय त्यावेळी साधारणत: केवळ २४ वर्षाचे होते. त्यावेळी मराठा राज्याची सर्व

---

१०. गोरे, रा.म., <u>उपरोक्त.</u>, पृ. २८.

प्रकारे अत्यंत चांगल्या नियमांच्या, व्यवहारांच्या व नैतिक तत्त्वांच्या तथा राजकीय सिध्दांतांच्या आधारे शिवाजी महाराजांना घडी बसवावयाची होती. त्यासाठी महसूल खात्याचा मंत्री अत्यंत योग्य, कर्तबगार, कर्तृत्ववान व स्वराज्याला प्रतिष्ठा लाभेल, अशा पध्दतीने काम करणारा असा हवा होता. रामचंद्रपंतानी ही जबाबदारी अत्यंत चांगल्या प्रकारे पार पाडलेली दिसते. त्यांच्यावर जी कामे सोपविली होती, त्यांची सविस्तर माहिती अशी--

"दप्तरचें सर्व लिहिणें, सर्व कारखान्यांची एकबेरजी, स्वराज्यांतील जमा-खर्चाची चौकशी, राजपत्रावर "लेखनालंकार", "बारसूद" हीं अक्षरें घालून तारीख घालणें, ही होती. या वेळीं कामाची व्यवस्था झाली, त्यांत चिटणिसांनी अमात्याचे निसबतीस राहून देशाधिकारी, दिवाण, निसबतीचे मामलेदार, जिल्हेदार, खजनीस, हवालदार, कारखाननीस, आणि गांवचा असणारे पाटील, कुलकर्णी वगैरे कामदार इत्यादिकांस पत्रे लिहावीं. त्या त्या प्रधानांनी आपापले कामांतील कायदे करावे आणि ते सर्वांनी मानावे असे ठोकळ नियम झाले. महाराजांकडून अमात्यांस पत्रे यावयाची असतील त्याजवरील मायना- "प्रथम राजश्री, नांव, पंक्ति, असे असून शेवटी बहुत लिहिणें सुज्ञ असा" असे लिहिण्याची पध्दत होती."११

सप्त प्रकरणातील बखरीत अमात्य पदाचे अधिकार आणि कर्तव्य पुढील प्रमाणे सांगितले आहे--

"अमात्य यांणीं सर्व राज्यांतील आयव्यय जमाखर्च होईल तो लेखनाधिकारी यांजपासून चौकशीनें लिहिणें करवून, आपण पाहून राजास निवेदन करावे.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

११. गोरे, रा.म. उपरोक्त., पृ. २८-२९.

राजपत्रांवर व जमाखर्चादि हिशोब सर्व राज्यांतील, महालांतील यांजवरि चिन्हें करावीं. राजास नित्य निवेदन करावें. येविशीं दक्ष निपुण असावें, व मोठी मोठीं राजकार्ये करून युध्दादि प्रसंग सैन्य घेऊन करावे."१२

. अमात्य म्हणूनची कारकीर्द:

शिवाजी महाराजांच्या हाताखाली आणि त्यांच्याअष्टप्रधान मंडळात अमात्य या नात्याने रामचंद्रपंतानी अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. अर्थात स.मा. गर्गे यांनी सांगितल्याप्रमाणे शिवाजी महाराजांच्या काळात रामचंद्रपंत इ.स. १६७७ पर्यंत अमात्य पदावर होते.[१३] म्हणजे राज्याभिषेकानंतर रामचंद्रपंताच्याकडे साडेतीन वर्षेच अमात्यपद होते. या अमात्य पदावर असताना आपल्यावर सोपविलेली कामगिरी यथार्थपणे पार पाडण्याचा त्यानी प्रयत्न केला. तथापि वा.सी. बेंद्रे यांनी मात्र रामचंद्रपंताच्या नाकर्तेपणाचा उल्लेख केलेला आहे.[१४] पण रामचंद्रपंताची पुढील यशस्वी कारकीर्द पाहता, बेंद्रे यांचे विधान बरोबर वाटत नाही. राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजानी सन १६७६ पर्यंत कोणतीही मोठी मोहिम आखलेली नाही. तारीख ३० जुलै १६७५ मध्ये कोल्हापूरच्या आदिलशाही सुभेदाराला खंडणी वसूल करण्याकरिता पन्हाला किल्ल्यावर शिवाजी महाराजांच्यासमोर उभे करण्यात आले होते व १६७५ च्या ऑगस्टमध्ये फोंडयाकडील मराठा सैन्याने जी सोंध्याकडे जी स्वारी केली होती ती सुध्दा काही प्रमाणात फसलेली होती.[१५]

राज्याभिषेकामुळे प्रवंडखर्च झालेला होता, तो भरून काढण्यासाठी राज्याभिषेकाच्या वेळीपासूनच शिवाजी महाराजांनी मोगल आणि आदिलशाहा यांच्या

---

१२. कुलकर्णी, भीमराव., उपरोक्त., पृ. १७०.
१३. गर्गे, स.मा., उपरोक्त., पृ. ८२.
१४. बेंद्रेसंभाजी., पृ. ४४२-४४३.
१५. काळे, दि.वि., उपरोक्त., पृ. २०१.

प्रदेशात स्वाऱ्या करण्याचे योजले होते. पण १६७४ आणि १६७५ या दोन वर्षांमध्ये फारशी दौलत मिळवता आली नव्हती. अशा परिस्थितीत शिवाजी राजानी कर्नाटक मोहिम हाती घेतली. सन १६७७ च्या जानेवारीमध्ये या मोहिमेवर निघताना त्यांनी दक्षिणेत म्हणजे आपल्या राज्याच्या देखरेखीसाठी तसेच मोगल आणि इतर शत्रू यांच्यापासून बचाव करण्यासाठी मोरोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो यांची नियुक्ती केली.[१६] आणि रघुनाथपंत हणमंते, निराजी रावजी आणि त्यांचा मुलगा प्रल्हाद निराजी यांना भागानगरकडे पुढे पाठविले. रघुनाथपंत हणमंते हे तंजावरहून व्यंकोजी राजे यांना सोडून शिवाजी महाराजांच्याकडे आलेले होते. रघुनाथपंत हणमंते यांना कर्नाटकातील, विशेषत: आदिलशाही राज्यातील जी माहिती होती त्या माहितीचा फायदा घेऊन शिवाजी राजाना कर्नाटकाच्या मोहिमेत धनदौलत आणि यश मिळवावयाचे होते. अशा परिस्थितीत शिवाजी राजे कर्नाटक मोहिमेवर गेले असताना रामचंद्रपंतानी महाराष्ट्रात राहून शिवाजी राजांनी जी कामगिरी त्यांच्याकडे सोपविली होती, ती व्यवस्थित पार पाडली. कर्नाटकाच्या मोहिमेवर जाण्यापूर्वी शिवाजीनी इ.स. १६७४-७६ या मध्ये रामदुर्ग व नरगुंद हे दोन किल्ले बांधून रामचंद्रपंताच्या स्वाधीन केले होते.[१७]

रामचंद्रपंताचे अमात्यपद, मात्र १६७७ च्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटी गेलेले दिसते.[१८] आणि तसे होणे स्वाभाविकही वाटते. कारण कर्नाटकाच्या मोहिमेमध्ये महाराजांना यश आले होते. दक्षिण दिग्विजयाची त्यांची मोहिम सफल झालेली होती आणि असा विजय प्राप्त करण्यासाठी दक्षिणेतील एखाद्या

---

१६. SGSNHM., pp. 238 - 239.
१७. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ. २९.
१८. ढेरे-जोशीआ., पृ.७.

जाणकाराकडून त्यांना हेथबूत माहिती हवी होती. ती माहिती पुरविण्याचे काम रघुनाथपंत हणमंते यांनी केलेले होते. हणमंते यांनी व्यंकोजी राजे भोसले यांचा द्रोह करून शिवाजी महाराजांना भरपूर माहिती पुरविली होती व शिवाजी महाराजांशी एकनिष्ठ राहाण्याचे वचनही दिले होते.[१९] या सर्वांचा परिणाम म्हणून कदाचित किंवा आणखी एखाद्या महत्त्वाच्या कारणामुळे शिवाजी महाराजांनी रामचंद्रपंताचे अमात्यपद काढून रघुनाथपंत हणमंते यांच्याकडे दिले असावे.[२०] शिवाय असेही असण्याची शक्यता आहे की ते पद रामचंद्रपंता-च्याकडे येण्यापूर्वी हणमंते यांच्याच घराण्याकडे होते. त्यामुळे हे पद पुन्हा रघुनाथपंत हणमंते यांच्या चांगल्या कामगिरीमुळे व त्यांने कर्नाटकातून मौल्यवान रत्ने व दागिने महाराजांना आणून दिल्यामुळे आणि एकनिष्ठा व्यक्त केल्यामुळे पूर्वी त्याच्या घराण्याकडे असलेले अमात्यपद, महाराजांनी त्यास परत दिले असावे.[२१]

इ.स. १६७७ ते १६८० म्हणजे शिवाजी महाराजांच्या अखेरपर्यंतची रामचंद्रपंताच्या कारकीर्दीची फारसी माहिती उपलब्ध नाही. सन १६७८ मध्ये शिवाजी महाराज रामदास स्वामीच्या भेटीसाठी सातारा-परळी येथे गेल्याचा उल्लेख व त्यांच्याबरोबर रामचंद्रपंत अमात्य या नात्याने हजर असल्याची माहिती, गोरे यांनी दिलेली आहे.[२२] परंतु गोरे यांच्या माहितीला दुजोरा मिळेल, असा पुरावा उपलब्ध होत नाही. म्हणून सन १६७७ ते १६८० या कालावधीमध्ये, शिवाजी राजे सांगतील ती कामे करण्याचीजबाबदारी रामचंद्रपंताने स्वीकारलेली असावी, असे दिसते. आणि पद किंवा अधिकार नसताना ही त्यांनी आपली

---

१९. SGSNHM., pp. 237 - 239.

२०. केळूसकर, कृ.अ., क्षात्रिय कुलावतंस छत्रपति शिवाजी महाराज यांचे चरित्र, मुंबई, १९२०, पृ. ४३०.

२१. Takakhav, N.S., Life of Shivaji, Vol.II, Sunita Publication, Delhi, Ed., 1987, pp. 425 - 426.

२२. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ. २९.

कामगिरी चोख बजावलेली असावी. म्हणूनच शिवाजी महाराजांच्या अंत्य समयी जे काही मोजके मुत्सद्दी व सरदार हजर होते, त्यांच्यामध्ये रामचंद्रपंताचा उल्लेख आहे.[२३]

शिवाजी महाराजांच्या काळात रामचंद्रपंतास, इस. १६६८ मध्ये सिंधुदुर्ग किल्ल्याची सबनिशी मिळाल्यापासून, ते त्यांच्याकडे दिलेले अमात्य पद राहीपर्यंत, म्हणजे सन १६७७ पर्यंत रामचंद्रपंताने मराठी राज्यात स्वत:च्या कर्तृत्वाचा ठसा कायमपणे राहील, असे महत्त्वपूर्ण काम केलेले आहे. तो कोकणातील सिंधुदुर्गाचा सबनिस होण्यापूर्वी ~~नव्हता~~ तेथील जमीनीचा सारा नियमितपणे व नियमाने वसूल होत नव्हता. तसेच तो वसूल करत असताना रयतेला त्रास सुध्दा होत होता. तेव्हा मराठा राज्य उभारणीचे ते दिवस होते. अशा प्रसंगी दोन गोष्टी साध्य करणे गरजेचे होते-पहिली अशी, की राज्य उभारणीसाठी द्रव्याची चणचण पडू नये याची काळजी घेणे व दुसरी ज्या रयतेकडून कराच्या रूपाने द्रव्य जमा करावयाचे होते, ते गोळा करत असताना रयतेला नव्या राज्यकर्त्यांने लुटले किंवा पिळले, असे वाटता कामा नये, याची काळजी घेणे. रामचंद्रपंताने अत्यंत तरूण वयातही मराठी राज्याचा जबाबदार अधिकारी म्हणून या गोष्टी चांगल्या समजून घेतल्या होत्या आणि शिवाजी महाराजांची प्रतिष्ठा वाढेल, लौकीक होईल तथा आपलाही,अधिकारी म्हणून वचक बसेल, हे लक्षात घेऊन अत्यंत अक्कल हुषारीने काम केले होते. त्यांच्या या धोरणामुळे त्याने त्याकेही धारेबंदी म्हणजे जमिनीचा धारा ठरविण्याचे काम केले, ते अत्यंत महत्त्वाचे ठरले. या बाबतीत रामचंद्रपंताच्या कार्याची नोंद

२३. वाकसकर, वि.स., संपा. उपरोक्त., पृ. ११०.

इतिहासकार सरदेसाई यांनी सुध्दा घेतली आहे. त्यांच्या मतानुसार सिंधुदुर्गाचा सबनिस असताना रामचंद्रपंतानी अण्णाजी दत्तो यास मदतीला घेऊन जमीनीची धारेबंदी पध्दत ठरवून दिली होती.[२४] रामचंद्रपंताची धारेबंदी पध्दत कोकणामध्ये यशस्वी ठरली आणि जवळ जवळ २०० वर्षे चालू राहिली.

या संदर्भात अधिक माहिती देताना गोरे यांनी सांगितले आहे की मराठी राज्य स्थिरस्थावर झाले होते, पण जमीन महसूलाची व्यवस्था सुरळीत चालू नव्हती. त्यामुळे जमिनीचा सारा नियमित वसूल होत नव्हता आणि तो ठरवितांना फार घोटाळा पडत असे. ही अडचण दूर करण्याकरितां रामचंद्रपंतांनी आपले मदतीस अणाजी दत्तो सचीव यास घेऊन जमिनीचा धारा ठरविण्याचे काही नियम केले आणि त्या रीतीनें जो धारा ठरविला, त्यास धारेबंदी असे नांव दिले. ही धारेबंदी पिकांचा १/६ एकषष्ठांश राजभाग या मानास अनुसरुन बागायत, भातशेती, वरकस इत्यादिकास काही थोडया कमी जास्तीचे फरकाने ठरविली होती. याकेळी कल्याणसुध्दा सर्व कोकणप्रांत दंग्याधोप्यामुळे उध्वस्त झाला होता. तेथील जमिनीची धारेबंदी ठरविली आणि वसाहत वाढविली. हे काम बरेच दिवस चालले होते. या धारेबंदीस वर्षाची (मुदतीची) इयत्ता नसून ही कायमची ठरविली होती. या कायमपणामुळे तेथील रयतेस सुख व संतोष होऊन ती या उभयतांची कीर्ति गात राहिली. त्या प्रांतात ही धारेबंदी सुमारे २०० दोनशे वर्षे कायम होती. कोकणप्रांतास ही रीति लागू झाल्यानंतर बाकीचे प्रांतास धारेबंदी व्हावयाची होती, परंतु इतर राजकीय उलाढालीमुळे हे काम इतकेच राहिले. ( या धारेबंदीस अनियत)मुदतीची पैमाष म्हणण्यास हरकत नाही.)[२५] कमल गोखले यांनी सुध्दा रामचंद्र पंताच्या अशा कामगिरीचा

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

२४. सगोसमरि., भाग २, पृ. ३७२.

२५. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ. ३०.

उल्लेख करताना स्पष्टपणे सांगितले आहे की त्यांने व अण्णाजी दत्तो यांने जमिनीची पहाणीकरुन "प्रतबंदीची"[२६] अंमलबजावणी केली होती. रामचंद्र-पंताच्या अशा कामगिरीचे महत्त्व सामान्यत: सर्वच इतिहासकारांनी केलेले आहे आणि त्याचे अमात्यपद त्याच्या नाकर्तेपणामुळे गेले, हे वा.सी. बेंद्रेचे मत बहुतेकांनी अमान्य केलेले आहे.[२७] मराठ्यांच्या इतिहासात शिवाजी महाराजांच्या नंतर रामचंद्रपंतानी फार महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे. मराठा राज्यातील अमात्य पद त्यांच्या नावाला कायमचे जोडलेले आहे. म्हणूनच श्री.ना. बनहट्टी म्हणतात, त्याप्रमाणे "मराठेशाहीच्या इतिहासात अमात्य म्हणजे रामचंद्रपंत हे समीकरण कायमचे विख्यात होऊन गेले."[२८]

.. क. संभाजीचे काळातील पंताचे कार्य:

मराठा राज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज ता. ३ एप्रिल, १६८० रोजी रायगडावर मरण पावले.[२९] मरणाच्या पूर्वी शिवाजी राजानी आपल्या पश्चात आपले राज्य कसे चालावे याचा गांभियाने विचार केलेला होता. महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक परंपरेनुसार शिवाजी महाराजांच्यानंतर छत्रपती म्हणजे राजा होण्याचा अधिकार त्यांचा ज्येष्ठ मुलगा युवराज संभाजी याचा होता. शिवाजी राजाना आठ बायका होत्या. पैकी शिर्के घराण्यातील सगुणाबाई ही ज्येष्ठ राणी होती. ती विनाअपत्य अगदी तरुणपणातच मरण पावली. महाराजांच्या राज्याभिषेकाच्यावेळी आठ पत्न्यांच्या पैकी चार हयात होत्या. पण या चौघींच्या पैकी सोयराबाईलाच मुलगा होता. ही सोयराबाई

---

२६. गोखले, कमल., शिवपुत्र संभाजी, नवकमल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ति, १९८१, पृ. ४१९.

२७. पगडी, सेतुमाधवराव., हिंदवी स्वराज्य आणि मोगल, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६६, पृ.११४-११५.

२८. बनहट्टी,श्री.ना., संपा.उपरोक्त., पृ.१९.

२९. गर्गे, स.मा., उपरोक्त., पृ. २६.

महाराजांची दोन क्रमांकाची राणी होती. त्यापूर्वी पट्टराणी असलेली सईबाई इ.स. १६५९ सालामध्ये वारली होती. सा सईबाईचा मुलगा संभाजी. त्याचा जन्म १४ मे १६५७ रोजी झाला होता.[30] आणि या संभाजीचा शिवाजी महाराजांच्या १६७४ मधील राज्याभिषेकाच्या वेळी युवराज म्हणून विधीपूर्वक राज्याभिषेक झाला होता.[31] संभाजीची आई मरण पावल्यामुळे शिवाजी महाराजांची तीन क्रमांकाची पत्नी सोयराबाई हिला महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी पट्टराणी म्हणून घोषित केले होते.[32] या सोयराबाईचा चिरंजीव राजाराम याचा जन्म दिनांक २४ फेब्रुवारी १६७० रोजी झाला होता.[33] म्हणजे पट्टराणी झालेल्या सोयराबाईच्या राजारामापेक्षा मृत पावलेल्या सईबाईचा मुलगा संभाजी, हा वयाने ज्येष्ठ होता आणि वयाने ज्येष्ठ असल्याने परंपरेनुसार त्याचा युवराजपदाचा अधिकार मिळाला होता. हा संभाजी तसा शिवाजीच्या कालातच कर्तृत्ववान व हुषार म्हणून प्रसिध्दीला आला होता.[34] परंतु त्याचे आणि शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानमंडळातील काही मंत्र्याचे जमत नव्हते. त्यामुळे त्याचे आणि शिवाजी महाराज यांच्यामध्ये गैरसमज निर्माण झाले होते. एकदा तर संभाजी बापाच्या उलट मोगलानांही जावून मिळाला होता.[35] त्यामुळे आपल्या पश्चात आपले राज्य कसे चालावे, याची व्यवस्था शिवाजी राजाना करणे गरजेचे होते. आणि एकावेळी पन्हाळा येथे असताना आपले राज्य दोन पुत्रांमध्ये वाटणी करुन ठेवतो, असे त्यांनी संभाजीला सांगितल्याचे सभासद बखरीत आहे. बखरीतील उल्लेख पुढील प्रमाणे आहे--

---

३०. गोखले, कमल., उपरोक्त., पृ.२४-२५.

३१. बेंद्रे, वा.सी., श्री छत्रपति राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७५, पृ.२७-२८.

३२. गोखले, कमल., उपरोक्त., ४५.

३३. बेंद्रे राजाराम., पृ.१२.

३४. गोखले., कमल., उपरोक्त., पृ.४८-५१.

३५. उपरोक्त., पृ. ५७-६१.

"राजा पुण्यश्लोक कालज्ञान जाणे. विचार पाहतां आयुष्याची मर्यादा झाली, असें करून जवळील कारकून व हुजरे लोक होते त्यांमध्यें सभ्य भले लोक बोलावून आणिले."[३६] आणि अशा बोलावून आणलेल्या अष्टप्रधान मंडळातील मंत्री व इतर महत्त्वाचे लोक यांच्यासमोर शिवाजी राजानी राज्य विभाजनाची इच्छा व्यक्त केली आणि स्वत:, आयुष्य संपत आल्याने कैलासास श्रीच्या दर्शनास जाणार असे स्पष्ट केले होते. मग अशा त-हेने प्रधानमंडळाला विश्वासात घेतल्यानंतर त्यांनी पन्हाळयावर असलेल्या संभाजीची भेट घेऊन त्यालाही आपला निर्णय पुढीलप्रमाणे सांगितला--

"तुम्हीं दोघे आपणांस. त्यांस राज्य वाटून देतों आणि उभयता सुखरूप राहणें." म्हणोन सांगितलें. परंतु वडील पुत्र संभाजी राजे यांनी ऐकिलें नाही."[३७] अशा त-हेने मराठा राज्याची विभागणी करण्याचे शिवाजी राजानी करण्याचे ठरविले होते व ते मनोगत अष्टप्रधान मंडळातील ज्या मंत्रयांच्या समोर तथा महत्त्वाच्या व्यक्तींसमोर कथन केले होते, त्यामध्ये सभासदाने रामचंद्रपंतांचा उल्लेख केलेला आहे.[३८] पण त्यावेळी जेधे शकावली प्रमाणे रामचंद्रपंताकडे अमात्यपद असेल, असे दिसत नाही. कारण त्याचे ते पद रघुनाथ नारायण हणमंते याच्याकडे ऑक्टोबर १६७७ मध्ये दिल्याचे शकावलीत म्हटले आहे.[३९] तेव्हा शिवाजीच्या अंत:समयी रामचंद्रपंताकडे महत्त्वाचा अधिकार नसला, तरी तो मराठा राज्यातील जबाबदार लोकांच्यापैकी एक व भोसले घराण्याशी पूर्वी पासून जवळीक असलेला महत्त्वाचा गृहस्थ, म्हणूनही त्याला शिवाजी राजानी आपल्या अंत्यसमयी जवळ बोलविले असल्याची शक्यता आहे.

---

३६. वाकसकर, वि.स., उपरोक्त., पृ.१०९-११०.
३७. उपरोक्त., पृ. ११०.
३८. उपरोक्त.
३९. Takakhav, N.S., Op. cit., p. 426

8268
A.

शिवाजी राजाने मराठा राज्याची विभागणी आपले दोन पुत्र संभाजी आणि राजाराम यांच्यामध्ये करून देण्याची जी योजना आखली होती, ती ज्येष्ठ पुत्र संभाजी याला मान्य नव्हती. शिवाजीच्या मृत्यूच्यावेळी त्याला पन्हाळ्यावर कैदेत ठेवले होते. महाराजांच्या मृत्यूची बातमीही त्याला ताबडतोब कळविली नव्हती. त्यानंतर त्याने तुरुंगातून स्वत:ची सुटका करून घेतली व तो सरळ मराठयांची राजधानी असलेल्या रायगड किल्लयाकडे गेला.[४०] स्वत:ला त्याने दिनांक २० जुलै १६८० रोजी मंचकारोहन केले.[४१] त्यानंतर त्याने जे अष्टप्रधान मंडळ जाहीर केले, त्यामध्ये रामचंद्रपंतांचा समावेश झालेला नव्हता. अमात्यपद संभाजीने अण्णाजी दत्तो यांच्याकडे त्याच्यापूर्वीच्या सचिव पदाऐवजी दिले होते.[४२] अणाजी दत्तोचे रिकामे झालेले सचिवपद जे होते, त्या पदावर रामचंद्रपंताची नियुक्तीझाली असावी किंवा संभाजीने स्वत:ला राज्याभिषेक करून घेतल्यावर त्याने ते सचीवपद रामचंद्रपंताकडे इ.स. १६८० च्या अखेरीस दिले असावे, असे वा.सी. बेंद्रे यांचे म्हणणे आहे.[४३] परंतु, कमल गोखले यांनी तत्कालीन कागदपत्रे व पोर्तुगीजांच्या बरोबर झालेला मराठयांचा पत्रव्यवहार पाहून जो निष्कर्ष काढला आहे तो खालील प्रमाणे आहे--

"शिवाजी महाराजांच्या काळात हे (सचीव) पद अण्णाजी दत्तोकडे होते. त्यांचा कटात हात असल्याने मे-जून १६८० मध्ये अटक करण्यात आल्यावर सचीव पद काही काळ आबाजी सोनदेव यांच्याकडे देण्यात आले. १६८० च्या ऑगस्ट महिन्यात राजांनी केलेल्या दानपत्रात आबाजी सोनदेव यांचा सचीव म्हणून शिक्का आहे. आबाजी सोनदेव मरण पावल्यावर हे सचीवपद रामचंद्र

---

४०. गोखले, कमल., <u>उपरोक्त</u>., पृ. ८२.

४१. <u>उपरोक्त</u>., पृ. ८५.

४२. Joshi, P.S., <u>Chhatrapati Sambhaji</u>, S.Chand & Compnay, Ltd., New Delhi, 1980, pp. 111-112.

४३. <u>बेंद्रेसंभाजी</u>., पृ. १००.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

निलकंठ भादणोकर याला दिले. कुडाळपासून तुंगभद्रेपर्यन्तचा प्रांत त्याच्या ताब्यात होता. त्याने १६८३ मध्ये पोर्तुगीजांशी पत्रव्यवहार केला होता. त्याची पत्रे उपलब्ध आहेत. त्याच्याकडे १६८५ सालापर्यन्त सचीवपद होते."[४४]

पण ते त्याच्याकडून काढून संभाजीने शंकराजी नारायण गाडेकर यांना दिले होते.[४५] त्या पूर्वी अमात्य असलेले रघुनाथ पंत हणमंते तारीख ४ मे १६८३रोजी मरण पावले होते. आणि त्यांचे अमात्यपद त्यांचा मुलगा नारायण रघुनाथ याला दिले होते.[४६] त्यामुळे रघुनाथ पंताचे अमात्यपद रामचंद्रपंताना दिले गेले असावे, असे जे शेजवलकरानी मांडले आहे, ते बरोबर नाही.[४७] आणि इ.स. मे १६८५ नंतर छ. संभाजी महाराज यांचा वध होईपर्यंत रामचंद्रपंताच्या कामगिरी विषयी माहिती किंवा कागदपत्रे उपलब्ध नाहीत. म्हणून मराठा राज्य जडण-घडणेच्या वेळी ज्या रामचंद्रपंतानी महत्त्वाची कामगिरी बजावली, त्या रामचंद्र-पंताच्या कार्याच्या विषयी संभाजीच्या काळातील अखेरच्या चार पाच वर्षाच्या बाबतीत अभ्यासकाला आज तरी फारसी माहिती मिळू शकत नाही. तथापी संभाजीच्याच काळात रामदास स्वामी मरण पावल्यावर संभाजीने सज्जनगडला जो मंत्री पाठवला होता, तो मंत्री म्हणजे रामचंद्रपंतच होते, असे कमल गोखले[४८] आणि पी.एस्. जोशी[४९] यांनी स्पष्ट केलेले आहे. रामचंद्रपंताने रामदास स्वामीच्या दहन विधीच्या जागी मंदीर बांधावे, असा हुकूम संभाजी राजे यांनी केला होता. त्यानुसार रामचंद्रपंतानी कारवाही सुध्दा केली होती.[५०]या माहिती खेरीज संभाजी राजांच्या कारकीर्दीतील रामचंद्रपंताच्या कार्याविषयी फारसी

---

४४. गोखले,कमल., उपरोक्त., पृ. ३४०.
४५. बेंद्रेसंभाजी., पृ. १०९.
४६. Joshi, P.S., Op. cit., p. 262
४७. शेजवलकर, त्र्यं.शं., उपरोक्त., पृ. ४०४.
४८. गोखले,कमल., उपरोक्त., पृ. ४४३.
४९. Joshi, P.S., Op. cit., pp. 287 - 288.
५०. गोखले,कमल., उपरोक्त., पृ. ४४३.

माहिती मिळत नाही. आणि रामचंद्रपंताचे मराठा राज्य चालविण्या-साठी जे मोलाचे कार्य केले आहे, व त्यांच्या अनुभवाचा तथा ज्ञानाचा फायदा मराठा राज्याला झाला आहे, तो काळ म्हणजे संभाजी महाराजांच्या नंतरचा आहे.

.....

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=